दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ ३४

# निवेदन

## महानिर्मितीच्या कनिष्ठ अभियंता (निर्मिती) परीक्षेचा निकाल जाहीर

नागपूर : राज्यातील विजेची वाढती मागणी लक्षात घेता उपलब्ध स्थापित क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने महानिर्मितीने तातडीने पावले उचलली आणि विस्तारित वीज प्रकल्प उभारणीची कामे हाती घेतली. सद्य:स्थितीत या सर्व विस्तारित वीज प्रकल्पांची कामे प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी प्रगतीपथावर आहेत.

वीज केंद्र तसेच वीज प्रकल्पांकरिता अभियांत्रिकी कुशल मनुष्यबळाची निकड लक्षात घेता महानिर्मितीतर्फे जाहिरात क्रमांक ०४/२००९ नुसार कनिष्ठ अभियंता (निर्मिती) या पदांकरिता २८ जून २००९ रोजी नागपूर, मुंबई, औरंगाबाद, नाशिक आणि पुणे अशा एकूण ५ केंद्रांवर लेखी परीक्षा घेण्यात आल्या तर ९ ते १६ ऑक्टोबर दरम्यान मुंबई येथे वैयक्तिक मुलाखती घेण्यात आल्या.

नुकताच सदर परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कनिष्ठ अभियंता (निर्मिती) या पदाच्या यशस्वी परीक्षार्थींची निवड यादी महानिर्मितीच्या **www.mahagenco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे महानिर्मितीकडून कळविण्यात येत आहे.

---

दिनांक : १२/११/२००९.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**